ISSN NO : 2347- 8209

# International journal of Researches in Social Science & Information Studies

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue | June - 2023



Edited By
History Department
Indraprastha New Arts, Commerce & Science College,
Wardha, Maharashtra (India) - 442 001

| | | |
|---|---|---|
| 13 | **War Strategy of the Sikhs under Banda Singh Bahadur**<br>**Dr. Balraj Singh ,**<br>**Assistant Professor,**<br>Department of History and<br>Punjab Historical Studies,<br>Punjabi University Patiala, Punjab<br>Email: balrajbrar@pbi.ac.in<br>**Rupinder Kaur,**<br>Research Scholar ,<br>Department of History and<br>Punjab Historical Studies,<br>Punjabi University Patiala, Punjab | 113 |
| 14 | **Women Rights**<br>**Prof. Satishkumar G. Dhawad**<br>Kumbhalkar College of Social Work<br>Wardha | 126 |
| 15 | **Killing-the controversial ethical issue and the concept of Human Rights— Are the two Compatible**<br>**Dr. Chaitali Choudhury**<br>Bijoy Krishna Girls' College,<br>Howrah West Bengal. | 135 |
| 16 | **INDIAN CONSTITUTION AND EDUCATIONAL RIGHTS**<br>**Dr Prashant R Kadwe**<br>Asst. Professor,<br>Department of History &<br>Director Gandhi Study Centre<br>Indraprastha<br>New Arts,Comm and Sci college Wardha M.S.<br>Mob: 09860600094,<br>E mail: kadweprashant06@gmail.com | 146 |
| 17 | नेताजी सुभाषचंद्र बोस : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते<br>डॉ. अफरोज हनिफ शेख<br>प्राध्यापक<br>इतिहास विभाग प्रमुख<br>श्री बिंझाणी नगर महाविद्यालय,<br>उमरेड रोड, नागपूर<br>मोबाईल क्र. –९९२३३८८९८७<br>८६००७८६२८९<br>ईमेल–afrozsheikh1966@gmail.com | 152 |
| 18 | महान देषभक्त –सुभाशचंद्र बोस<br>प्रा.संजय उत्तमराव उगेमुगे<br>चिंतामणी महाविद्यालय,पोंभूर्णा<br>जिल्हा चंद्रपूर पिन न.442918<br>फोन नं 9623555612<br>sanjayugemuge80@gmail.com | 158 |
| 19 | आझाद हिंद सेनेचे सरसेनापती– नेताजी सुभाषचचंद्र बोस<br>प्रा. डॉ. रमेश के. शेन्डे<br>मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य<br>महाविद्यालय नरखेड जि. नागपूर. म.रा.<br>मो. न. ९४२३६०४७२३<br>Email Id – rkshende70@gmail.com | 164 |

ISSN NO.: 2347-8709

# नेताजी सुभाषचंद्र बोस : भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते

डॉ. अफरोज हनिफ शेख
प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय,
उमरेड रोड, नागपूर
मोबाईल क्र. — ९९२३३८८९८७
८६००७८६२८९
ईमेल—afrozsheikh1966@gmail.com

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक थोर नेते, अद्वितीय प्रतिभाशाली व्यक्तीत्वाचे धनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची कामगिरी भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहल्या गेली आहे. भारताच्या स्वातंत्र्याकरिता विदेशात जावून, सैन्य संगठन उभारून, भारतीय स्वातंत्र्याचा झेंडा फडकवणारे महान नेता म्हणून भारतीय कधीच विसरु शकत नाही.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे झाला. त्यांचे वडील जानकीनाथ हे कटक येथे वकिलीचा व्यवसाय करीत होते. सुभाषचंद्र बोस यांच्या आईचे नाम प्रभावती देवी होते. स्वामी विवेकानंद व अरविंद घोष यांच्या विचारांच्या प्रभावामुळे सुभाषचंद्र बोस आध्यात्माकडे आकर्षित झाले. इसवी सन् १९१९ मध्ये पदवी परीक्षा उत्तीर्ण करून आय.सी.एस. परिक्षा पास केली. पण महात्मा गांधीच्या असहकार चळवळीत सहभाग घेतला त्याबद्दल त्यांना अटक करून सहा महिन्याची शिक्षा ही झाली.

नेताजी सुभाषचंद्र बोस 'जहाल' क्रांतीकारी विचारांचे पुरस्कर्ते होते त्यांनी ऑक्टोबर १९२३ मध्ये 'फॉरवर्ड' नावाचे इंग्रजी दैनिक सुरू केले.[१] नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा काही क्रांतीकारकांशी संबंध आहे या संशयावरून त्यांना २५ ऑक्टोबर १९२४ रोजी अटक करण्यात आली. त्यांची रवानगी मंडालेच्या कारागृहात करण्यात आली, त्यावेळेस त्यांचे वय २८ वर्षाचे होते. मंडालेच्या तुरुगांत दुर्गापूजा हा सण साजरा करु न दिल्याने त्यांनी तुरुगांत अन्नसत्याग्रह पुकारला. इतकंच नव्हे तर 'द इंग्लिशमन', 'द कॅथॉलिक हेरॉल्ड', यांनी ''क्रांतीकारकांचे खरे सुत्रधार सुभाषचंद्र बोस'' अश्या शिर्षकांव्दारे बदनामी केल्यामुळे या वृत्तपत्रांवर ५० हजाराचा अब्रु नुकसानीचा खटला भरला. त्यात कोर्टाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. १९२६ मध्ये तुरुगांत असतांना देखील कायदेमंडळाच्या निवडणूकीत जतीन्द्रनाथ सेनगुप्ता यांच्या विरोधात निवडणूक लढवून विजय मिळविला. १९२७ मध्ये तुरुगांतून सुटका झाल्यावर जेव्हा त्याचवर्षी भारतात सायमन कमीशन आला

तेंव्हा सुभाषचंद्र बोस यांनी लोकांमध्ये जागृती घडवून आणण्याचे महान कार्य केले. १९२८ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात स्वयंसेवक दलाची जबाबदारी सुभाषचंद्र यांना सोपविल्या गेली. त्यांचा लष्करी पद्धतीचा पोषाख व शिस्तबद्ध संचालन बघून भावी 'सेनाधिकारी' म्हणून सुभाषचंद्र बोस यांचा गौरव करण्यात आला. जमशेदपूर येथील टाटा आयर्न अण्ड स्टील वर्क्स येथील कामगारांच्या संपाचे नेतृत्व त्यांनी केले. १९३० च्या आयटक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९३० मध्येच कलकत्ता येथे महापौर च्या निवडणूकीत ते निवडून आले.

पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या भावी घटनेचा मसूदा तयार करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली. ह्या समितीत पं. जवाहरलाल नेहरू, बॅरिस्टर जयकर तेजबहादूर सप्रु, बापूजी अणे आदि सदस्यांसह नेताजी सुभाषचंद्र बोसही होते.[२] पंडित जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांच्या रूपाने काँग्रेसमध्ये युवकांचा गट उदयास आलेला होता या गटाला वसाहतीचे स्वराज्य अजिबात मान्य नव्हते. त्यांचा भर पूर्ण स्वातंर्त्य मिळण्यावर होता.[३]

२६ जानेवारी १९३० हा दिवस देशभर 'स्वातंत्र्य दिवस' म्हणून साजरा करावयाचे लाहोरच्या अधिवेशनात ठरते होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी तिरंगा झेंडा हातात घेऊन नेतृत्व केले त्यात त्यांना ब्रिटीश सरकारने अटक करून सहा महिन्याची शिक्षा दिली. अश्या प्रकारे ब्रिटीश सरकारने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अतिजहाल विचारसरणीमुळे १९३३ पर्यंत अनेक वेळा कारावास सहन करावा लागला.

ब्रिटीश सरकारच्या परवानगीने १९३३ मध्ये युरोपात जाऊन १९३६ पर्यंत तेथे वास्तव्य केले. हिटलर, मुसोलिनी व डी व्हलेरा या नेत्यांना भेटण्याकरिता त्यांच्या देशात गेले. तरुणांमध्ये अतिशय लोकप्रिय असल्यामुळे काँग्रेसमधील तरुण गटाचे नेतृत्व सुभाषचंद्रांकडे होते. १९३८ मध्ये हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.[४] महात्मा गांधीच्या अहिंसक तत्वज्ञानावर सुभाषचंद्रांचा विश्वास व श्रध्दा नमल्यामुळे ते म. गांधीच्या तत्वज्ञानावर हल्ले चढवीत असत. विशिष्ट मुदतीत जर ब्रिटीशांनी सत्तात्याग केला नाही, तर प्रत्यक्ष प्रतिकाराच्या मार्गाने भारतीयांनी प्रतिस्पर्धी राज्ययंत्रणा निर्माण करावी, अशी त्यांची भूमिका होती, जी विचारसरणी म. गांधीजींना अमान्य होती. १९३९ मध्ये त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुभाषचंद्र बोस उभे राहिले व निवडणूक जिंकले. पण त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.[५]

१९३९ मध्ये सुभाषचंद्रांनी काँग्रेस पक्षांतर्गत ''फॉरवर्ड ब्लाक''ची स्थापना केली. जमींदार, भांडवलदार, सावकार यांच्या अन्यायाविरुद्ध लढा देऊन शेतकरी व कामगार वर्गाच्या कल्याणाकरिता कार्य करणे हे प्रमुख उद्दिष्ट फॉरवर्ड ब्लॉकचे होते. द्वितीय महायुध्दास १ सप्टेंबर १९३९ रोजी सुरुवात झाली. द्वितीय महायुद्धात इंग्लंड अडचणीत

असल्याने आपण भारतीयांनी आपला स्वातंत्र्यलढा तीव्र करावयास हवा, असे त्यांचे मत होते. १९४० मध्ये ब्रिटीश सरकारने त्यांच्या प्रक्षोभक भाषण व लेखामुळे 'भारत सुरक्षा कायद्या' खाली अटक केली. (जुलै १९४०) तुरूंगात असताना सुभाचंद्रांनी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे ५ डिसेंबर १९४० रोजी सुटका केली. नजरकैदेत असतांना १७ जानेवारी १९४१ रोजी ते वेष बदलवून निसटले. झियाउद्दीन नाव धारण करून ते पेशावरच्या बाजूने अफगाणिस्थानात व तेथून रशियात पोहोचले. २८ मार्च रोजी ते मास्कोहून विमानाने बर्लिनला पोहोचले. हिटलरच्या मदतीने त्यांनी २६ जानेवारी १९४२ रोजी 'आझाद हिन्द सेना' स्थापन केली. युद्धकालीन जर्मनीत सुभाषचंद्रांना किती स्वातंत्र्य होते हे जर्मनीतील हंगेरियन वकिलाच्या उद्‌गारावरून सहज समजून येते. तो म्हणतो, ''आम्ही जर्मनीचे दोस्त आहोत पण कोणत्याही पूर्व युरोपीय राष्ट्रांपेक्षा सुभाषचंद्रांच्या संघटनेत अधिक स्वातंत्र्य व हक्क मिळालेले आहेत.''[६]

जपानच्या पर्लहार्बरवरील हल्ल्याने सुभाषचंद्रांना एक अभूतपूर्व संधी मिळाली. जपानच्या मदतीने आणि आग्नेय आशियातील हिन्दी लोकांच्या सहकार्याने आपला देश स्वतंत्र करता येईल असे सुभाषचन्द्र बोस यांना वाटले. याच दरम्यान त्यांना जपानमध्ये असलेले प्रसिद्ध क्रांतीकारक रासबिहारी बोस यांचे पूर्वेकडे येण्याचे निमंत्रण मिळाले. १६ में १९४३ ला टोकियोत पोहचले. जपानचे पंतप्रधान जनरल टोजो यांनी जपानी लोकसभेत घोषणा केली, ''भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयपूर्तीसाठी शक्य ते सर्व साहाय्य पुरविण्याचा आमचा निर्धार झालेला आहे.''[७]

पूर्व आशियातील भारतीयांना उद्देशून आकाशवाणीवरून सुभाषचंद्रांनी आवाहन केले, ''भारत बळकावून बसलेल्या ब्रिटीश सैन्याविरुद्ध सशस्त्र क्रांतीची योजना आखून अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने लढा देणे, आपल्या भारतीयांवर, बांधवाना शक्य नाही, तेव्हा त्याचे उत्तरदायित्व इतरत्र वास्तव्य करणाऱ्या भारतीयांवर, विशेषत: पूर्व आशियात वास्तव्य करणाऱ्या भारतीयांवर येते. ———————— लढा देण्याची ही वेळ आता आली असून प्रत्येक देशाभिमानी भारतीयाने समरभूमीकडे चाल करावयास हवी. स्वातंत्र्यप्रेमी भारतीयांचे रक्त सांडू लागले की, त्या बलिदानातूनच भारताला आपले स्वातंत्र्य संपादन करता येईल.''भारतातील आपल्या देशबांधवांना उद्देशून एका भाषणात टोकियो आकाशवाणीवरून सुभाषचंद्र म्हणाले, ''माझ्यावर श्रद्धा ठेवा. आयुष्यभर माझा छळवाद मांडणाऱ्या आणि मला अकरा वेळा तुरुंगात डांबणाऱ्या बलाढ्य ब्रिटीश सरकारला माझे नैतिक धैर्य नष्ट करता आले नाही. ———————— भारताच्या सीमेपासून मी आता फारसा दूर नाही ———————— आपल्या राष्ट्रीय संग्रामाच्या या शेवटच्या अध्यायात सहभागी होण्यासाठी फिरून एकदा भारताची सीमा ओलांडण्यापासून पृथ्वीच्या पाठीवरील कोणतीही सत्ता मला परावृत्त करू शकणार नाही.'' ४ जुलै १९४३ ला कॅथे

 ISSN NO.: 2347-8709

त्रपटगृहात उपस्थित असलेल्या पाच हजार भारतीय जनसमुदायासमोर सुभाषचंद्रांनी ोवृद्ध क्रांतीकारक रासबिहारी बोस यांच्याकडून पूर्व आशियातील भारतीय स्वातंत्र्य ग्रामातील अधिकारसुत्रे औपचारिकरित्या स्वीकारली. तेंव्हा जनतेनी अत्यंत प्रेमाने भाषचंद्रांना 'नेताजी' ही पदवी बहाल केली.[८]

५ जुलै १९४३ ता सिंगापूरच्या नगर सभागृहापुढील भव्य पटांगणात आझाद हिन्द नेच्या शिस्तबद्ध दिमाखदार संचलन प्रसंगी मानवंदना स्वीकारल्यानंतर नेताजी म्हणाले, ुमची युद्धघोषणा 'चलो दिल्ली' ही आहे, 'चलो दिल्ली' हीच युद्धघोषणा कायम नादत राहू द्या. दिल्लीच्या लाल किल्ल्यात ब्रिटीश साम्राज्याचे पतन झाल्यावर त्यांच्या ़नभूमीवर आपल्यातल्या जगल्यावाचल्या वीरांचं विजयी संचलन साजरं होईपर्यंत ापले काम पूर्णत्वास जाणार नाही. जय हिन्द, चलो दिल्ली.''[९]

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्थापना ली. त्यांनी शपथ वाचन करीत असतांना म्हंटले की, ''मी सुभाषचंद्र बोस, माझ्या वटच्या श्वासापर्यंत पवित्र स्वातंत्र्य संग्राम अखंड चालू ठेवीन मी सदैव भारताचा सेवक ून राहील आणि आपल्या ३८ कोटी भारतीय बांधवांच्या हितसंबंधांची काळजी वाहणे माझ्या दृष्टीनं परमोच्च कर्तव्य राहील. स्वातंत्र्य संपादन केल्यानंतर ही भारताच्या ग्रातंत्र्याचं रक्षण करण्यासाठी स्वतःच्या रक्ताचा शेवटचा बिंदू सांडण्यासही मी सदैव ज्ज राहीन.''[१०]

नेताजीनी 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा' असे आवाहन केले. भारतीय ोकांनी यास प्रतिसाद देऊन आझाद हिंद सेनेत सामील झाले. या मुक्तिसेनेचे बळ होते ताजी सुभाषचंद्र बोस, त्यांची जाज्ज्वल्य राष्ट्रनिष्ठा, अभंग व उदंड आत्मविश्वास, ाप्रतिम संघटनचातुर्य व रणझुंझार युद्ध नेतृत्व, त्यांनी युद्धघोषणा म्हणून — चलो दिल्ली! ा नारा दिला, भारत — ब्रह्मदेश सीमेवर उभे असलेल्या नेताजींनी आपल्या भाषणात ्हटले की, ''तिकडे, त्या नदीपलीकडे, जंगलांपलीकडे, त्या टेकड्यांपलीकडे आपली ायभूमी आहे ज्यामातीतून आपण जन्मास आलो ती — ज्या भूमीत आता आपण पुन्हा ापस जाणार आहोत. नीट कान देऊन ऐका, आपली प्रिय भारतमाता आपल्याला साद ालीत आहे. ———————— रक्त रक्ताच्या नात्याने साद घालीत आहे. आता ापल्याजवळ गमवायला वेळ नाही. ———————— परमेश्वराची ईच्छा असेल तर ापण हुतात्म्यांचे वीरमरण पत्करूया ———————— दिल्लीचा रस्ता हा भारताच्या वातंत्र्याचा रस्ता आहे ''चलो दिल्ली!''[११]

जपानी मदतीमुळे आझाद हिंद सेनेने मणिपूर, कोहिमा, इंफाल पर्यंत मजल मारली. ाणिपूर मधील मोईरांग हे ठाणे जिंकून तेथे सर्वप्रथम भारताचा तिरंगा फडकाविला.

द्वितीय महायुध्यात जर्मनीच्या पराभवाने युध्दाचे पारडे फिरले. अमेरिकेच्या हिरोशिमा व नागासाकी येथील अणुबाँब हल्ल्यामुळे जपानने शरणागती पत्कारली. (१४ ऑगस्ट १९४५) त्याबरोबरच आझाद हिंद सरकारच्या स्वातंत्र्यलढ्याचा शेवट झाला. तरी सुध्दा भारतीयांना उद्देशून काढलेल्या आदेशात नेताजी म्हणतात ''------ आपल्या तात्पुरत्या पराजयाने विषण्ण होऊ नका ---------- भारताच्या भवितव्यावरील आपला विश्वास क्षणभरही डळमळीत होऊ देऊ नका. भारताला दास्यत्वात कायम जखडून ठेवू शकणारी एक ही सत्ता पृथ्वीच्या पाठीवर अस्तित्वात नाहीय भारत स्वतंत्र होईलच; फारसा विलंब न लागताच अल्पावधीतच भारत स्वतंत्र होईल. जय हिंद!''

प्रयत्नांची पराकाष्ठा पणास लावून ही मानवास नियतीपुढे नमावे लगाते, हे कटूसत्य विसरता येत नाही. १७ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी विमानात नेताजी व कर्नल हबीबुर्रहमान अज्ञात प्रवासाकडे निघाले असता, तो विमान फार्मोसा बेटातील ताय पै या विमानतळावर अपघातग्रस्त झाला. त्यात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले. ही बातमी २३ ऑगस्ट १९४५ रोजी टोकियो आकाशवाणी ने प्रसारित केली. त्यानंतर एप्रिल १९५६ मध्ये शाहनवाझखान समिती ने चौकशी करून 'नेताजी सुभाषचंद्रबोस यांचे विमान अपघाततच निधन झाले' असा निष्कर्ष दिला.[१२]

**निष्कर्ष :—**

''गाझियों में बू रहेगी ज़ब तलक इमान की,
तब तक लंदन तक चलेगी तेग हिंदुस्थानकी।''

मोगल सम्राट बहादूरशहा जफरच्या प्रतिक्षेचे पुनरुच्चार करणारे, ''तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा। जय हिंद। चलो दिल्ली'' अश्या उद्घोषणा देणारे तडफदार, तरुण क्रांतीकारकाचे नेते, जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा व देशप्रेमी, आझाद हिंद सेनेचे निर्माति, भारताच्या स्वातंत्र्यासाठी देहभान विसरून सर्वस्व अर्पण करावयास सिद्ध असलेले नेतृत्व, युवकांमध्ये स्वार्थत्यागाची अभूतपूर्व लहर संचारीत करणारे कुशल संघटक — मार्गदर्शक आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाची आहुती मागणारे उत्कृष्ट सैन्याधिकारी व स्वयंसेवक, परदेशात जाऊन ब्रिटीशांविरुद्ध युद्ध करून मातृभूमीवर सर्वप्रथम आपका तिरंगा झेंडा फडकवणारे वैशिष्ट्यपूर्ण खंबीर नेते अश्या कितीतरी बिरुदावल्या कमी पडतात, जेव्हा नेतानी सुभाषचंद्र बोस यांचे वर्णन केल्या जाते. आपल्या अथक परिश्रमाने भारतीय स्वातंत्र्य लढयात त्यांनी जी मोलाची कामगिरी केली त्यामुळे भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची कामगिरी सुवर्णाक्षरांनी लिहल्या गेली आहे, असे म्हटल्यास अतिश्योक्तिपूर्ण ठरणार नाही.

**संदर्भ :—**

ISSN NO.: 2347-8709


१. चापले सतीश, झोड अनिल, डवरे शरद — आधुनिक भारताचा इतिहास (१७६१ ते १९७१) पृ. क्र. १४३ (२०१३) प्रथमावृत्ती.

२. दीक्षित नी सी. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड इ. स. १८८६ ते १९४७ पृ. क्र. ५३.

३. उपरोक्त ५४.

४. आचार्य धनंजय, 'भारताचा इतिहास (१७१८ ते १९७१) पृ. क्र. २७८.

५. आ. भा. (२०१३) पृ. क्र. १४४.

६. कोलारकर, डॉ. श. गो, आधुनिक भारत (१७६० ते १९५०) प्र. आ. २००४, पृ. क्र. ३८२.

७. आचार्य पृ. क्र. २७९, २८०.

८. उपरोक्त २८३, २८४.

९. शेख प्रा. गफर, आधुनिक भारताच्या इतिहास (१७६५—१९८४) (२००५) पृ. क्र. २६४.

१०. आचार्य २८२

११. उपरोक्त २८३, व भटनागर राजेन्द्र मोहन शदिल्ली चलें.

१२. Wikipedia.org/wiki/Subhas Chandia Bose, वाळिंबे वि.स. — नेताजी (२०००) पुणे.